## रे.मु.नं.२४/२०१५ मधील नि.क्र.५ वरील आदेश

**पुंडलिक लक्ष्मण कांबरी** ... *वादी*
*वि.*
***दामु कानु कांबरी वगैरे*** ... ***प्रतिवादी***

सदरचा अर्ज वादीने दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादींनी स्वत: अगर इतरामार्फत दावामिळकतीत त्रयस्थ इसमाचा हक्क हितसंबंध प्रस्थापित करू नये म्हणुन म्हणुन तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जात वादीचे कथन की, वादी व प्रतिवादी क्र.१ ते २० हे एकमेकांचे सख्खे नातेवाईक असुन वादी हे कानु गोविंद कांबरी यांचा मुलगा लक्ष्मण कानु कांबरी यांची मुले आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादीचे सख्खे चुलते असुन प्रतिवादी क्र.४ ही वादीची सख्खी आई आहे. प्रतिवादी क्र.५ ते २० हे वादीचे चुलत नातेवाईक आहेत. वादी व प्रतिवादी यांचे पुर्वज गोविंद कांबरी व कानु कांबरी यांच्या मालकी ताबेकब्जात मौजे बार्डी ता.कर्जत, जि.रायगड येथील दावा कलम २ मध्ये नमुद केलेल्या मिळकती होत्या. गोविंद कांबरी हे दिनांक ०१/१०/१९५८ साली मयत झाले. त्यांचे पश्चात कानु व राघो यांच्या नावाची नोंद सदर मिळकतीस फेरफार क्र.२९६ ने नोंदली गेली.राघो यांच्या हिश्श्याची मिळकत त्यांचे हयातीतच त्यांचे हिश्श्यास देण्यात आली. कान्हु हे सन १९७४ साली मयत झाले. कानु यांना वादींचे वडील लक्ष्मण व प्रतिवादी क्र.१ ते ३, बबन, काशिनाथ हे वारस होते. कानु यांचे मुत्युपुर्वी वादीचे वडील लक्ष्मण हे मयत झाले होते, त्यामुळे कानुचे पश्चात वादी हे कायदेशीर वारस होते परंतु कानु यांच्या मृत्युसमयी वादी हे अज्ञान असल्यामुळे त्यांची आई निर्मलाबाई यांचे एकटीचेच नावाची नोंद मिळकतीस झाली व तसा फेरफार क्र.४२२ नोंदला गेला. वादी यांची दावा मिळकत वडीलोपार्जित आहे, परंतु

प्रतिवादी क्र.१ ते २० यांचेच नावाची नोंद झाली आहे. वादी फेरफार क्र. ४२२ विरूध्द उपविभागीय अधिकारी, कर्जत यांचेकडे दाद मागणार आहेत. दावा मिळकत वादीचे ताबाकब्जात आहे. प्रतिवादीकडे त्यांनी त्याचे हिश्याची मागणी केली असता प्रतिवादींनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे वादींनी हा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. त्यादरम्यान प्रतिवादी क्र.१४, १६ ते १८ यांनी सर्व्हे नं.३३/६क पैकी ४० गुंठे मिळकत प्रतिवादी क्र.२१ ला विक्री केली. प्रतिवादी क्र.२१ ने सदर मिळकत प्रतिवादी क्र.२२ व २३ यांना विक्री केली. तसेच प्रतिवादी क्र.१४ व १६ ते १८ यांनी या सर्व्हे नंबरमधील उर्वरित ३३ गुंठे मिळकत प्रतिवादी क्र.२२ ला विक्री केली तसेच प्रतिवादी क्र.१४ व १६ ते १८ यांनी सर्व्हे नं.४२/९ व ४३/७ या मिळकती प्रतिवादी क्र.२४ व २५ यांना विक्री केल्या. तसेच सर्व्हे नं.२१/१अ, २५/७ड, २६/१अ, ३४/४क या मिळकती प्रतिवादी क्र.५ ते १३ यांचे नावे झाल्या आहेत. दावा मिळकतीचे आजतागायत वाटप झालेले नाही त्यामुळे प्रतिवादींनी केलेली खरेदीखते ही बेकादेशीर असुन वादीवर बंधनकारक नाहीत. सदरचा दावा चालण्यास बराच कालावधी जाणार आहे त्यादरम्यान प्रतिवादींनी त्रयस्थ इसमाचे हक्क हितसंबंध निर्माण केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे त्यामुळे प्रतिवादींविरूध्द तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी. वादीने अर्जाचे पुष्ठयर्थ नि.क्र.६ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ ते ६ व ८ ते १३ यांनी निशाणी क्र.६२ वर म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज मंजुर होण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी वादीचे वडील लक्ष्मण कांबरी यांचा दावा मिळकतीत हक्क असल्याने वादी यांना समान अधिकार आहे, नजरचुकीने वादीचे नाव फेरफारास लावणे राहुन गेले असे कथन केले व वादीनी दिलेली वंशवेल बरोबर असुन वादीचा अर्ज मंजुर करावा असे नमुद केले आहे.

०४. प्रतिवादी क्र.२१ यांनी नि.क्र.६४ वर, प्रतिवादी क्र.२४ यांनी नि.क्र.६६ वर कैफियत दाखल केली. प्रतिवादी क्र.२३ ने नि.क्र.८० वर पुरसिस दाखल करून त्यांची कैफियत स्विकारली आहे. या प्रतिवादीचे कथन की, वादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. वादी हे लक्ष्मणचे वारस नाहीत. फेरफार क्र.४२२ मंजुर होवून बराच कालावधी लोटला, तरी वादींनी त्याबाबत कोणतेही अपील दाखल केलेले नाही, त्यामुळे वादीचे या अर्जास मुदतीच्या कायदयाची बाधा येत आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीची पुर्ण माहिती घेवुन बरीच रक्कम खर्च करून दावा मिळकती खरेदी घेतल्या आहेत, त्यामुळे ते दावा मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार आहेत. वादीचे अर्जास मुदतीच्या कायदयाची बाधा येत असल्याने अर्ज नामंजुर करण्याची प्रतिवादींची विंनती आहे.

०५. अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन करुन खालील मुददे माझे विचारार्थ उत्पन्न झाले आहेत. त्यांचे त्यावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | ... होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे का ? | ... होय. |
| ३. | तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास वादींचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे का ? | ... होय. |
| ४. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :: कारणमिमांसा ::

०६. वादींनी त्यांचे कथनाचे पुष्ठयर्थ निशाणी क्र.४ चे लिस्टापोटी दावा मिळकतीचे सातबारा उतारे व फेरफार दाखल केले

आहेत. यापैकी काही मिळकतीवर प्रतिवादी क्र.१४, १६ ते १८ यांची नावे असुन काही मिळकतीवर सर्व प्रतिवादींची नावे आहेत. वादींनी दाखल केलेल्या मौजे बार्डी, ता.कर्जत येथील फेरफार क्र.२९६ या उता-याचे अवलोकन करता गोंविद कांबरी यांचे पश्चात दावा मिळकतींना कानु व राघो यांची नावे लागली आहेत तसेच फेरफार क्र.४२२ चे अवलोकन करता कानु यांचे पश्चात बबन, दामु, काशिनाथ, नामदेव, सदाशिव, सुन निर्मलाबाई व पत्नी लक्ष्मीबाई यांची नावे लागली आहेत. त्याचबरोबर वादीने प्रतिवादी क्र.२१ ते २५ यांचे लाभात झालेल्या खरेदीखताच्या साक्षांकित प्रती दाखल केल्या आहेत, ज्यानुसार काही दावा मिळकती या प्रतिवादी क्र.२१ व २५ यांचे नावावर झाल्या आहेत.

**<u>मुददा क्र.१ ते ३ साठी</u> :-**

०७. तिनही मुदयांसाठी लागणारा पुरावा एकच असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तिनही मुददे एकत्रात चर्चिले आहेत.

०८. सदरचा अर्ज नि.क्र.५ साठी असल्याने कागदपत्रांची कायदेशीरपणे शाबीती होण्यापूर्वी त्यांना चर्चिण्यात येणार आहे.

०९. वादीचे कथन की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ ते २० यांच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. वादीचे वडील लक्ष्मण यांचे मुत्युसमयी वादी अज्ञान असल्याने त्यांची आई निर्मलाबाई हिचे नाव दावा मिळकतीस लागले आहे पण दावा मिळकतीत वादी यांचा हक्क आहे. प्रतिवादी क्र.२१ ते २५ यांनी सदरची बाब नाकारली आहे. वादींनी ते लक्ष्मणचे वारस आहेत हे दाखविण्यासाठी कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही पण प्रतिवादी क्र.१ ते ६ व ८ ते १३ यांच्या नि.क्र.६२ वरील कैफियतीचे अवलोकन करता, त्यांनी वादी हे लक्ष्मणचे वारस असल्याची बाब मान्य केली आहे. प्रतिवादींनी सदरची

बाब मान्य केल्याने सकृतदर्शनी वादी हे लक्ष्मणचे वारस आहेत असे दिसुन येते पण दावा मिळकतीस वादीचे नाव नाही. काही दावा मिळकती सध्या प्रतिवादी क्र.२१ ते २५ चे नावे आहेत. वादीनी सदरचा दावा ठरावाकरिता, वाटपाकरिता व मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. जर प्रतिवादींनी दावा प्रलंबन काळात दावा मिळकती विक्री केल्यास दाव्यामध्ये अनावश्यक गुंतागुंत निर्माण होणार आहे, ती टाळण्यासाठी प्रतिवादींनी दावा प्रलंबन काळासाठी तुर्तातुर्त ताकीद देणे न्यायाचे राहील. वादीनी सकृतदर्शनी ते लक्ष्मणचे वारस आहेत हे दाखवून दिल्याने तसेच न्यायाचा समतोल वादीचे बाजुने असल्याने मी मुददा क्र.१ ते ३ यांना होकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र.४:-

१०.    ज्याअर्थी मी मुद्दा क्र.१ ते ३ यांना होकारार्थी नोंदविले त्याअर्थी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीत त्रयस्थ इसमाचे हक्क हितसंबध निर्माण करू नयेत म्हणुन प्रतिवादींविरूध्द तुर्तार्तुत ताकीद देणे न्यायाचे राहील. कारणे आदेश.

## :: आदेश ::

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादीनी दावा मिळकतीत त्रयस्थ इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करु नये किंवा दावा मिळकत हस्तांतरीत करु नये, अशी यांना तुर्तातुर्त ताकीद देणेत येत आहे.

कर्जत                                   **(शु.भि.यादव)**
दि.०४/१०/२०१७          सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.